# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय,शीव,मुंबई-22</u>**

क्र. लोटिरु./ 7739 /अधिष्ठाता. दिनांक:- 11.06.2021

## सूचना परिपत्रक.

....................

लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील रक्तपेढी या विभागातील रक्त संक्रमण अधिकारी या संवर्गातील 01 पद रिक्त आहे. सदर रिक्त पद कंत्राटी तत्त्वावर एकावेळी तीस दिवसांपेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरीता प्रत्येक 29 दिवसांनंतर एक दिवस सेवाखंड देऊन पुर्ननेमणुक अशा स्वरुपात अर्हताधारक उमेदवाराकडून वॉक-इन- सिलेक्शन पध्दतीने भरण्यांत येणार आहेत.

सदर उमेदवारांनी अर्जासह अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई 400 022,यांच्या दालनात दिनांक **23.06.2021** रोजी सकाळी **11.00** वाजता प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (walk-in-interview) उपस्थित रहावे. उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती मुलाखतीच्यावेळी घेऊन यावीत.

**<u>पदाचा तपशील:-</u>**

| पदाचे नांव | वेतनश्रेणी | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| रक्त संक्रमण अधिकारी | 80,000<br>(ऐंशी हजार रुपये मात्र) | 01 |

**<u>शैक्षणिक अर्हता</u>:-**

1) उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. उमेदवार मेडिसीन - एम. डी. (पॅथलॉजी)/ (ट्रान्सफ्युजन मेडिसीन) मध्ये पदव्युत्तर पदवीधारक (Postgraduate Degree in Medicine – M.D. (Pathology/Transfusion Medicine) असावा.

अथवा

2) उमेदवार मेडिसीन मधील पदवी ( एम.बी.बी.एस) व पॅथोलॉजीमधील पदविका (Degree Medicines

(M.B.B.S) with Diploma in Pathology) धारक असावा. किंवा ट्रान्सफ्युजन मेडिसीनमधील पदविकेसह मेडिसीन मधील पदवी ( एम.बी.बी.एस) व ट्रान्सफ्युजन मेडिसीनमधील तसेच, रक्तगट सेरॉलॉजी, रक्तगट मेथडॉलॉजी आणि वैद्यकीय तत्वे त्यासंबंधातील घटक तयार करण्यासंबंधी किमान १ वर्षाचा अनुभव असावा. (Transfusion Medicine having adequate knowledge in Blood

group serology, Blood group Methodology and Medical Principles involved in procurement of blood and / or preparation of its components.)

अथवा

3) नियमित सेवाकाळात एक वर्षासाठी रक्तपेढीतील अनुभवासह मेडीसीनमधील पदवी (एम.बी.बी.एस.) आणि त्याबरोबर रक्तगट सेरॉलॉजी, रक्त गट मेथडॉलॉजी आणि रक्त पुरवठ्यातील वैद्यकिय तत्वे आणि/अथवा त्यासाठीचे घटक तयार करण्यासंबधी १ वर्षाचा अनुभव असावा. (Degree in Medicine(M.B.B.S.) having experience in Blood Bank for 1 year during regular service and also has adequate knowledge and experience blood group serology, blood group methodology and Medical principles involved in a procurement of blood or preparation of its components) असावा. (पदवी अथवा पदविका केंद्र सरकारद्वारा मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील असावी.)

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण,इ. च्या प्रमाणित प्रतीलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**वयाची अट:-** सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा अधिक नसावे व मागासवर्गीयांकरीता 43 वर्षापेक्षा अधिक नसावे.

**नेमणूक:-** उमेदवारांची करारनामा सापेक्ष नेमणूक करण्यात येईल.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्त्वावर असल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 व मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाही.

डॉ.(श्री.) मोहन जोशी
अधिष्ठाता,
लो.टि.म.स.रुग्णालय, शीव,मुंबई-22

| | | |
|---|---|---|
| विभाग प्रमुख,<br>विकृतीशास्त्र विभाग<br>लो.टि.म.स.रुग्णालय | उप अधिष्ठाता(म)<br>लो.टि.म.स.रुग्णालय | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी<br>लो.टि.म.स.रुग्णालय |